प्रेसनोट दिनांक ०३/०१/२०२४

**करमुल्यांकन विभाग, भिवंडी-निजामपुरा महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे येथील करमुल्यांकन अधिकारी व कर्मचारी यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनदिनी नोंद कमांक | :- | निजामपुरा पो.स्टे. भिवंडी, ठाणे दैनदिनी नोंद कमांक २५/२०२४- १५:५९ वाजता दि. ०३/०१/२०२४ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | **१)** श्री किशोर शिवराम केणे, वय ५१ वर्षे, लिपीक (वर्ग-३), करमुल्याकंन विभाग,<br>**२)** श्री सुदाम नारायण जाधव, वय ५४ वर्षे, वसुली निरीक्षक, विभाग प्रमुख कर मुल्याकंन ( अति.कार्यभार पर्यावरण अधिकारी ) (वर्ग - ३)<br>**३)** श्रीमती सायराबानो रफीउज्जमा अन्सारी वय ५२ वर्षे, लिपीक, तथा प्रभारी कार्यालयीन अधिक्षक, (वर्ग-३), सर्व नेमणुक करमुल्याकंन विभाग, भिवंडी निजामपुरा, महानगरपालिका, भिवंडी जि. ठाणे |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. २,०७,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.१,५०,०००/- लाचेची मागणी. |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू. १,५०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तकारदार यांचेकडे अधिकार पत्र प्राप्त असलेल्या विना परवाना विकसित केलेल्या बांधकामांचा मालमत्ता कमांक कायम करुन महानगरपालिकेडील प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, जुनी कर आकारणी रद्द करुन नव्याने सुधारित करआकरणी लागु करण्यासाठी आलोसे क. १,२ व ३ यांनी एकुण बांधकाम करण्यात आलेल्या क्षेत्र १३८०० चौरस फुटाचे १५ रुपये दराने एकुण २,०७,०००/- ची मागणी केले बाबत तकार दिली होती.<br>तकारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक कमांक १ केणे व लोकसेवक कमांक २ जाधव यांनी तकारदार यांचेकडे १३,८०० चौरस फुटाचे १५ रुपये चौरस फुट प्रमाणे २,०५०००/- रुपयाची मागणी केली तसेच फेरसर्वे प्रमाणे १०४०० चौरस फुट करीता रुपये १५/ प्रमाणे १,५६,०००/ रक्कमेची मागणी करुन तडजोंडीअंती रुपये १,५००००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन लोकसेवक कमांक २ यांनी सदरची रक्कम लोकसेवक कमांक १ यांना स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर पडताळणी दरम्यानच लोकसेवक कमांक ०३ श्रीमती सायराबानो अन्सारी यांनी लोकसेवक क. ०१ यांना सदर लाच मागणी व स्विकारणे करीता प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दिनांक ०३/०१/२०२४ रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक कमांक ०१ केणे यांना तकारदार यांचेकडुन रू.१,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना भिवंडी महानगरपालिका येथील ०६ व्या मजल्यावर लिफ्ट समोरील सुवर्णजयंती विभागाच्या शेजारील मोकळया रुम मध्ये पंच साक्षीदार यांचे समक्ष १३:०४ वा.रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक क. ०२ व क. ०३ यांनी लोकसेवक क. ०१ यांना सदर लाच मागणी व स्विकारणेकरीता प्रोत्साहन दिले म्हणुन लोकसेवक क. ०२ व क. ०३ यांना देखील नमुद वेळी ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी:- मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. सुधाकर सुरडकर, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**(संतोष पाटील)**
**पोलीस निरीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई**

**संपर्कपत्ता:- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२५८३३३४४
व्हॉटसॲप क. :- ९९३०९९७७००